पुणे, शुक्रवार, २१ जून २०२४ ■ पाने १२ किंमत ₹ ६

NiE NEWSPAPER IN EDUCATION

सकाळ

# प्रथा जुनी, विचार नवा

दोस्तांनो, वटपौर्णिमेचा सण जवळ आला की, घराघरांत वडाच्या झाडाची पूजा करण्याची लगबग सुरू होते. तुमच्या घरातही आई, बहीण किंवा घरातील इतर महिला या दिवशी वडाच्या झाडाची पूजा करताना तुम्ही पाहिल्या असतील. या दिवशी महिला वडाच्या झाडाची पूजा करतात आणि त्यांच्या पतीसाठी दीर्घायुष्य मागतात. मात्र, **या परंपरेचे पालन विचार करताना पर्यावरणाकडे दुर्लक्ष होऊन चालणार नाही. त्यामुळेच आपण आज वडाच्या झाडाची माहिती घेणार आहोत. ही माहिती तुम्ही वाचा आणि इथून पुढच्या प्रत्येक वटपौर्णिमेला किमान एक वडाचं झाड लावून त्याला वाढवण्याचा निश्चय करा.**

## शतायुषी झाड

वडाचं झाड शतायुषी असतं. ते १०० वर्षांहून अधिक काळ जगू शकतं. वडाच्या झाडातून ऑक्सिजन म्हणजेच प्राणवायू मोठ्या प्रमाणावर बाहेर पडतो. त्यामुळे या झाडाचं संरक्षण करणं आवश्यक आहे. महिलांनी वडाच्या झाडाला फेऱ्या मारण्यामागे त्यांना मोठ्या प्रमाणावर ऑक्सिजन मिळावा अशीही एक धारणा आहे. पश्चिम बंगालमधील सिबपूर (कोलकाता) येथे असलेल्या आचार्य जगदीशचंद्र बोस भारतीय वनस्पति उद्यानात आपल्या देशातील सर्वांत प्राचीन असे वडाचे झाड आहे. या झाडाचे वय २५० वर्षांहून जास्त आहे. ते ७९ फूट उंच असून, साधारणतः ४.६ एकर एवढ्या क्षेत्रात पसरले आहे.

## धार्मिक महत्त्व

ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा हा दिवस 'वटपौर्णिमा' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी स्त्रिया वटपौर्णिमेचे व्रत करतात. सावित्री, सत्यवान यांची पूजा करतात. कहाणी वाचतात. वडाच्या झाडाला सूत (दोरा) गुंडाळतात. उपवासही करतात. महिला या दिवशी वडाच्या झाडाची पूजा करून सात जन्मी तोच पती मिळू दे अशी प्रार्थना करतात.



**वडाचे एक झाड दर तासाला सुमारे ७०० किलोग्रॅम इतक्या प्रचंड मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन वातावरणात सोडते, तसेच उन्हाळ्यात दिवसाला भरपूर पाणी बाष्परूपात बाहेर फेकते.**

**वड हा भारताचा राष्ट्रीय वृक्ष असून त्याला 'वटवृक्ष' असेही म्हणतात.**



**औषधी गुणधर्म :** वडाच्या प्रत्येक भागाचा म्हणजे चीक, मुळे, पाने, फुले, साल यांचा औषध म्हणून उपयोग होतो. जखम भरण्यासाठी व दातातील वेदना थांबविण्यासाठी चीक वापरतात. वडाच्या कोवळ्या पारंब्या घालून केशवर्धक तेल तयार करतात, तसेच पारंब्या शिकेकाईत उकळून त्या पाण्याने केस धुतल्यास केस वाढतात, लांब होतात, मऊ व काळे होतात. पित्त, कफ, दाह, ओकारी, सूज, व्रण यांवर वडाचे झाड गुणकारी ठरते.

## हे आवर्जून करा...

- वटपौर्णिमेच्या दिवशी वडाच्या झाडाच्या फांद्या पूजेसाठी तोडून विकल्या जातात, यामुळे झाडांची हानी होते. तुमच्या आजूबाजूला असे कोणी करत असल्यास त्यांना रोखा. फांदी विकत आणू नका.
- वटपौर्णिमेच्या दिवशी घरातील मंडळींसोबत वड किंवा इतर कोणतेही झाड लावा आणि त्याची काळजी घेऊन वाढवा. तुमच्या मित्र-मैत्रिणींनाही हे करायला सांगा.
- वटपौर्णिमेच्या दिवशी अनेक झाडांना मोठ्या प्रमाणावर सूत गुंडाळले जाते, ते दिवसेंदिवस तसेच राहते. त्यामुळे झाडाला त्रास होतो. पौर्णिमेनंतर अशा प्रकारचे सूत काढून झाडाला मोकळा श्वास घेऊ द्या.

## तुम्हाला माहीत आहे का?

वड हा मोरेसी कुलातील वृक्ष असून, त्याचे शास्त्रीय नाव फायकस बेंगालेन्सिस आहे. उंबर, पिंपळ, अंजीर, पिंपळी हे वृक्षसुद्धा मोरेसी कुलातील आहेत.

सद्यस्थितीला वडाचा जगातील सर्वांत मोठा वृक्ष आंध्र प्रदेशातील अनंतपूर येथे असून त्याला 'थिम्माम्मा मरीमनू' असे म्हणतात.

## मी पेन बोलतोय...

दोस्तांनो, मी पेन बोलतोय! मी तुमच्या बॅगेत, कपाटात, ऑफिसच्या ड्रॉव्हरमध्ये असतो. विद्यार्थी व तरुण वर्गासाठी मी खूप उपयुक्त आहे. मी अतिशय कमी किंवा खूप मोठ्या किमतीतही उपलब्ध होतो. मला हजारो वर्षांचा इतिहास आहे आणि माझ्यात जग बदलण्याची ताकद अजूनही आहे.

आज प्रत्येक देशातील लोक माझा उपयोग लेखनासाठी करतात. आपापल्या गरजेनुसार ते माझा उपयोग करून घेतात. कोणत्याही देशाचे भविष्य म्हणून ओळखले जाणारे विद्यार्थी माझ्याच साहाय्याने लेखन करणे शिकतात. मी त्यांच्या यशस्वी भविष्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो आणि याचा मला खूप अभिमान आहे.

फक्त विद्यार्थीच नव्हे, तर मोठ मोठे पत्रकार, साहित्यिकदेखील माझा वापर करतात. ते माझ्या मदतीने देशातील घटना व बातम्या कागदावर उतरवतात आणि याच बातम्या दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात छापल्या जातात. लेखक कथा, कादंबरी लिहितात. त्यामुळे मला या गोष्टीचा फार अभिमान आहे की, मी समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्य करतो.

माझ्या इतिहासाबद्दल सांगायचे झाले, तर आजपर्यंत माझ्या रूपांमध्ये वेगवेगळ्या वेळी बदल होत गेले आहेत. आधीच्या काळात माझे स्वरूप आजपेक्षा भिन्न होते. त्या काळात साधू-संत माझा उपयोग ग्रंथ लिहिण्यासाठी करायचे, त्याला बोरू म्हटले जायचे. नंतरच्या काळात शाई पेन आले. लाकडी पेनही आले. तिथपासून आजच्या बॉल पेनपर्यंतचा माझा प्रवास खूप प्रदीर्घ आणि रंजक आहे. आज मोबाइलमुळे माझा वापर थोडा कमी होत असला, तरी तो पूर्णपणे बंद होणे शक्य नाही. कारण, तुम्ही विद्यार्थीमित्र माझा वापर खूप प्रेमाने करतात हे मला ठाऊक आहे. तुम्ही खूप छान लिहा आणि मोठे व्हा...!

**- सोनाली फिरमे**





जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बाडगव्हाण, ता. शेवगाव, जि. अहमदनगर येथील विद्यार्थी एनआयई वृत्तपत्राचे मोठ्या आनंदाने सामुहिक वाचन करताना. (छायाचित्र : अमोल विठ्ठल कांबळे, प्राथमिक शिक्षक)

## शाळेचा लळा

भरली मुलांची शाळा
अन् फुलला आनंदाचा मळा
दुमदुमला परिसर
उत्साहाने सारे झाले गोळा

नवा दिवस, नवे पुस्तक,
दप्तर, गणवेश नवा नवा
सुट्टीनंतर शिक्षकांनाही
प्रत्येक विद्यार्थी हवा हवा

जुन्या मित्र-मैत्रिणींची
झाली सुंदर गाठ-भेट
ऑफलाइनमध्येच आहे मजा
शाळाच आमची आहे ग्रेट

मधल्या सुट्टीतील डब्याची
गंमतच काही न्यारी
पोषण आहाराची चव चाखण्यात
रमली मुले सारी

बघता बघता
सुटली शाळा
सर्वांनाच लागला आता
शाळेचा लळा

**- प्रीतम पंडित - फिसरेकर,**
अण्णासाहेब कल्याणी
विद्यालय, सातारा



# आपले नेताजी


नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशामधील राज्यातील कटक शहरात एका बंगाली हिंदू कुटुंबामध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ बोस, तर आईचे नाव प्रभावती होते. जानकीनाथ बोस हे कटक शहरातील प्रसिद्ध वकील होते. सुभाषचंद्र बोस हे कोलकाता विश्व विद्यालयातून पदवीधर झाले. या नंतर ते इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी प्रशासकीय सेवेचा अभ्यास केला. त्या परीक्षेत ते चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले, परंतु देशभक्ती आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची इच्छा त्यांना शांत बसू देत नव्हती. एप्रिल १९२१ मध्ये त्यांनी इंग्लंडमधील नागरी सेवेतून राजीनामा दिला व ते परत भारतात आले. भारतात आल्यावर त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सहभाग घेतला. त्यांनी बंगाल आणि बंगालच्या आजूबाजूच्या परिसरातील युवकांना एकत्र करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.



नेताजींचे विचार गांधीजींपेक्षा थोडे वेगळे होते. सुभाषचंद्र बोस इंग्रजांच्या अत्याचारी शासनाच्या विरोधात सशस्त्र क्रांती करण्याचे समर्थक होते. १९३९ मध्ये जेव्हा द्वितीय महायुद्ध सुरू झाले, तेव्हा इंग्रजांनी त्यांना कोलकत्यात नजरबंद केले. मात्र, बोस मोठ्या शिताफीने त्या नजरकैदेतून बाहेर पडले. अफगाणिस्तान व सोव्हिएत संघाच्या मार्गाने ते जर्मनीत गेले. जर्मनीत नेताजी हिटलरालाही भेटले. त्या नंतर सिंगापूरला जाऊन त्यांनी आझाद हिंद सेनेचे संघटन करण्यास सुरुवात केली.

नेताजी आपल्या आझाद हिंद फौजेसोबत ४ जुलै १९४४ ला बर्मा येथे पोहोचले. इथेच त्यांनी आपली प्रसिद्ध घोषणा, 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दुंगा' दिली. १८ ऑगस्ट १९४५ ला टोकियोला जाताना तैवानजवळ हवाई अपघातादरम्यान नेताजींचा मृत्यू झाला. परंतु, त्यांचा मृतदेह उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे नेताजींचा मृत्यू हे एक गूढ तयार झाले असून, अनेक अभ्यासक त्याबाबत संशोधन करीत आहेत.

**- विराज भातखंडे**

**विश्वराज निघोट,** सातवी
ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय
निगडी, पुणे




**अर्णव ढगे,**
भारत चिल्ड्रेन्स अकॅडमी अँड
ज्युनि. कॉलेज, वालचंदनगर





**वरद भागवत,** सहावी
श्री देव गोपाळकृष्ण माध्यमिक
विद्यामंदिर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी

? २) नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कुठे झाला?

✓ ४) जगातील सर्वात मोठा टेलिफोन नेदरलँडमध्ये आहे.

# भावनिक प्रतिसादाचे सामर्थ्य

मित्र-मैत्रिणींनो, दुःख, आनंद, भीती, आश्चर्य, राग अशा अनेक भावना आपण दिवसभरात वेळोवेळी दाखवत असतो. त्या प्रसंगी जे जे वाटेल ते भावनांच्या मदतीने आपण व्यक्त करत असतो. मात्र, सगळ्यांना हे तितक्याच सहजपणे जमतं असंही नाही. तुमचा एखादा मित्र त्याचा राग मनातच ठेवत असेल किंवा हसू येत असूनही मोकळेपणाने हसत नसेल, रडू येताना त्याला स्वतःबद्दल कमीपणा वाटत असेल. असं का होतं? कारण, आपण आपल्याच भावना व्यक्त करायला कचरतो. बऱ्याच लोकांना त्यात कमीपणा वाटतो. भावनांच्या आहारी न जाता वेळोवेळी त्या व्यक्त केल्या, तर आपण अधिक प्रसन्न राहतो. निराशा येत नाही आणि संवेदनशीलताही वाढते.



## अतिविचार नको

आपण कोणत्याही प्रकारच्या भावना व्यक्त करण्याआधी अतिविचार करणं टाळायला हवं. अतिविचार केल्याने जे मनापासून वाटतं, ते बाहेर येत नाही आणि मन मोकळं होत नाही. विचार करणं योग्य असलं, तरी अतिविचार त्रासदायक ठरतात. त्यामुळे ज्या गोष्टी अस्तित्वात नाहीत, त्यांच्याबाबतही आपण विचार करत बसतो. त्याने ताण अधिक वाढतो आणि कोंडमारा होतो. असे लोक एकटे पडू लागतात, ते इतरांशी बोलणे टाळतात. त्यांच्या भावना सतत अव्यक्त राहतात. त्यामुळे अतिविचार करू नका.

## आपल्यासारखे इतर शोधा

आपण जसे आहोत, तशाच प्रकारच्या लोकांमध्ये आपण अधिक रमतो. उदा. तुम्हाला खेळायला आवडत असेल, तर खेळण्याची आवड असलेल्या मुलांमध्येच तुम्ही जास्त रमाल. भावनांच्या बाबतीतही असंच होतं. आपला स्वभाव जसा असतो, तशा स्वभावाचे लोक आपल्याला आवडतात. त्यांच्याशी आपलं जास्त पटतं. त्यामुळे तुमच्यासारखे लोक शोधा आणि त्यांच्यात स्वतःच्या भावना व्यक्त करा.

भावना व्यक्त केल्याने नक्की काय होतं? मन शांत होतं का? चित्त एकाग्र होते का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे तुम्हाला हवी असल्यास 'आर युवर इमोशन्स लाइक माइन?' नावाचं पुस्तक आवर्जून वाचा.

## भावनांची भीती नको

कोणतीही भावना व्यक्त करायला घाबरू नका. दिलखुलास हसणं, मोकळेपणाने रडणं, राग आल्यास चिडणं हे खूप साहजिक आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या भावनेबद्दल मनात भीती बाळगू नका. न्यूनगंडात राहू नका. जे वाटतं ते कोणाजवळ तरी स्पष्टपणे बोला. भावना व्यक्त न झाल्यास मनावर दडपण येतं. त्यामुळे चुकूनही त्या अवस्थेत जाऊ नका.

## मन शांत ठेवा

भावना व्यक्त करणं महत्त्वाचं असलं, तरी मन शांत ठेवणंही तेवढंच महत्त्वाचं आहे. तुमच्यापैकी अनेकांना परीक्षेच्या वेळी टेन्शन येत असेल किंवा शाळेत शिक्षकांनी रागवल्यावर खूप वाईट वाटत असेल, तर अशा वेळी मन शांत ठेवायला शिका. आई-बाबांशी किंवा घरातील मोठ्या भावंडांशी बोला. तुम्हाला कळत नसलेल्या गोष्टी त्यांच्याकडून समजून घ्या.

# श्री शिवराज्याभिषेक

"ज्येष्ठ शुध्द त्रयोदशी"!! भारतदेशाच्या कालगणनेतील, इतिहासाच्या पानावरील अत्यंत मंगलमय, पवित्र दिवस. शेकडो वर्षांच्या परकीय गुलामीचे सावट दूर करून, रायगडावर स्वातंत्र्याचा सूर्योदय झाला तो दिवस. "श्री शिवराज्याभिषेकाचा" दिवस.

■ सौरभ कर्डे

**मागील लेखात आपण राज्याभिषेकाची कारणे अन् पार्श्वभूमी पाहिली. आता पाहूया, कसा झाला शिवरायांना राज्याभिषेक?**

■ महाराजांनी प्रतापगड येथे भवानी मातेचे पूजन केले व सव्वामण सोन्याचे छत्र देवीस अर्पण केले. (१९ मे १६७४)

**मंगल विधी सुरू :** मुंज, तुलादान, तुलापुरुषदान इत्यादी विधी करण्यात आले. यामध्ये सुवर्ण, रौप्य, ताम्र धातूंनी तुला करून दान करण्यात आले.

■ **३० मे १६७४ रोजी :** विवाह, नंतर गणेशपूजन, पुण्याहवाचन, षोडशमातृका पूजन, नांदिश्राद्ध, रक्तसूत्रकंकण व इतर विधी झाले.

■ यानंतर, बुधवारी नक्षत्रयज्ञ होऊन प्रतिमादान केले. गुरुवारी 'निर्ऋतियाग' आणि शुक्रवारी 'ऐंद्रियशांती'चे कार्य झाले. (४-५ जून १६७४ ) आणि त्यानंतर उजाडला, ज्येष्ठ शुध्द त्रयोदशी, शालिवाहन शके १५९७, सन १६७४ चा दिवस, शिवराज्याभिषेक दिन. या महन्मंगल पवित्र सोहळ्याचे तीन टप्पे आहेत. त्यानुसार पाहूया.

■ **अभिषेक :** ठरल्या वेळेत महाराज अभिषेकाला बसले. वेदमंत्राचा घोष दुमदुमला. तूप, दूध, मध, दही, सप्तगंगा, समुद्रजल, महातीर्थे यांचा अभिषेक महाराजांवर झाला. उष्णोदकस्नान झाले. अष्टप्रधानातील प्रधान व राजपुरोहितांनी महाराजांना अभिषेक घातला. हा पहिला टप्पा, महाराज 'अभिषिक्त' झाले.

■ **सिंहासनाधिश्वर :** ३२ मण सुवर्णकाम आणि रत्नजडित असे सिंहासन बनवलेले. अभिषेकानंतर वस्त्रालंकार व तलवार, धनुष्यबाण धारण करून, महाराज राजदरबाराकडे निघाले. दरबार चहूबाजूंनी भरला होता. घोडदळ, पायदळ, नजरबाज खातं, आरमार या खात्यांचे मानकरी महाराजांना मुजरा करण्यास आसुसले होते. मुहूर्ताची घटिका बुडाली आणि राजदरबारात प्रवेशलेल्या शिवरायांनी सिंहासनाला वंदन करून ते त्यावर आरूढ झाले. हा दुसरा टप्पा, महाराज 'सिंहासनाधिश्वर' झाले.

■ **छत्रपती :** सिंहासनावर आरूढ होताच मंगल वाद्ये, तोफा, चौघडे, नगारे वाजू लागले. सोळा सुवासिनी, सोळा कुमारिकांनी राजांना औक्षण केलं. त्यानंतर तो क्षण आला. मोत्यांची झालर लावलेले रत्नजडित राजछत्र शिवरायांच्या मस्तकावर धरण्यात आले. हा तिसरा टप्पा, महाराज 'छत्रपती' झाले.

यानंतर महाराजांना सुवर्णाभिषेक (८००० होन) करण्यात आला. परकीय सत्तांच्या प्रतिनिधींनी (इंग्रज) राजांना राजदरबारात येऊन वाकून त्रिवार मुजरे केले. शतकांच्या प्रतीक्षेनंतर असा दिवस उजाडला. भारतमातेच्या पायी अडकलेल्या पारतंत्र्याच्या बेड्या, शिवरायांनी रायगडावर तोडल्या. दहा दिशांना गर्जना घुमली. प्रौढप्रतापपुरंदर क्षत्रियकुलावंतस सिंहासनाधिश्वर महाराजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज की जय ! जय ! जय !

*(लेखक शिवव्याख्याते आहेत.)*

शिवसृष्टी आंबेगाव (बु.), पुणे
किल्ल्याच्या तटबंदीत बाण व बंदुकीच्या गोळ्यांचा मारा करण्यासाठी ठेवलेल्या मारगिरीच्या जागा म्हणजे जंग्या... यासारख्या शिवछत्रपतींच्या गडकिल्ल्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेबद्दल अनेकविध गोष्टींची माहिती घेण्यासाठी आजच 'शिवसृष्टी'ला भेट द्या!
३५
समजण्या शिवरायांची दृष्टी... पाहूया भव्य शिवसृष्टी
वेळ: सोमवार ते शुक्रवार : सकाळी १० ते दुपारी ५, शनिवार-रविवार व सार्वजनिक सुट्ट्यांचे दिवशी : सकाळी १० ते सायं. ६
Location
तिकीट दर: लहान मुले (वय ५ ते १५ वर्षे) : रु. ८० प्रत्येकी, मोठ्या व्यक्ती : रु. २५० प्रत्येकी, १०पेक्षा जास्त व्यक्तींचा समूह : रु. २०० प्रत्येकी
सर्व अंकांचे क्रमवार संकलन करा आणि जिंका 'शिवसृष्टी'च्यावतीने एक खास बक्षीस!
महाराजा शिवछत्रपति प्रतिष्ठान 'शिवसृष्टी', आंबेगाव (बु.), कात्रज-देहू बाह्यवळण रस्ता, पुणे www.shivsrushtipune.com

visit sakalnie.in
'सकाळ' सादर करीत आहे
मुलांचं हक्काचं वृत्तपत्र!
- ज्ञान, माहिती, मनोरंजन आणि उपक्रम -



सकाळ NiE NEWSPAPER IN EDUCATION
वार्षिक वर्गणी फक्त ₹३००/-
शैक्षणिक वर्षातील प्रत्येक शुक्रवारी वृत्तपत्र
१२ पानी रंगीत अंक

- NIE उपक्रमात मिळणाऱ्या सेवा-सुविधा -
शालेय शिक्षणासाठी अँड्रॉइड ॲप मोफत: इयत्ता ५ वी ते १० वी च्या मराठी आणि सेमी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना रिव्हीजनसाठी NIE मोबाईल ॲप
अनेक वर्कशॉप्स आणि धमाल स्पर्धा!: पर्यावरणपूरक गणपती मेकिंग, किल्ला बनवा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, इव्हेंट्स आणि ऑनलाईन स्वरूपात विनामूल्य तसेच सशुल्क विविध स्पर्धा.
आकर्षक गिफ्ट मिळवा!: QR Code स्कॅन करून वार्षिक वर्गणी भरा व ₹६९९/- चे आकर्षक गिफ्ट मिळवा! FREE

NIE अंक पाहण्यासाठी वरील QR कोड स्कॅन करा
- NiE अंकामध्ये प्रसिद्ध होणारी माहितीपर आणि मनोरंजक सदरे -
जनरल नॉलेज : इतिहास, भूगोल, विज्ञानातल्या फॅक्ट्स, नवीन टेक्नॉलॉजीची माहिती । नव्या गोष्टी शिकूया : वेळेचं महत्त्व, छंद जोपासणं आणि सकारात्मक विचार । आरोग्य : डाएट, योग्य दिनक्रम, व्यायाम याची गोडी लावणारी माहिती । संस्कार : श्लोक, सुविचार, ग्राफिटी आणि धमाल विनोद । हे करून पाहा : कोडी, सुडोकू, चित्रकला । माझं पान : शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी लिहिलेले साहित्य । आनंददायी शनिवार
आपल्या वृत्तपत्र विक्रेत्याकडे आजच नावनोंदणी करा. | अधिक माहितीसाठी संपर्क 98815 98815

## सकाळ NiE सभासद नोंदणी फॉर्म

आजच फॉर्म भरा आणी NiE वृत्तपत्र सुरू करा

फॉर्म नं: ______

विद्यार्थ्याचे नाव : ______

घराचा पत्ता : ______

तालुका : ______ जिल्हा : ______ पिनकोड : ______

ई मेल : ______ पालकांचा मोबाईल नंबर ______

शाळेचे नाव : ______

इयत्ता : ______ तुकडी : (   ) NIE सभासद रक्कम : ______

सभासद कालावधी : ______ ते ______

अंक चालू करण्याची तारीख : ______ रोख ☐ ऑनलाईन ☐

विद्यार्थी / विद्यार्थिनी / वाचकाची सही

शुल्क स्वीकारणाऱ्याचे नाव व सही

## वृत्तपत्र विक्रेता / एजंट तपशील

खाते क्रमांक : ______ एजंटचे पूर्ण नाव : ______ गाव : ______

विक्री केंद्राचे नाव : ______ विक्रेत्याचे नाव : ______ खाते क्रमांक : ______

## सभासद शुल्क पोचपावती

दिनांक : ______ २०२४

कुमार / कुमारी ______ यांचेकडून

सकाळ NIE या उपक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ चे वार्षिक सभासद शुल्क रक्कम ₹३००/- रोख मिळाली.

धन्यवाद !

शुल्क भरणाऱ्याची सही

शुल्क स्वीकारणाऱ्याचे नाव व सही

संपर्कासाठी नं. : ९८८१५ ९८८१५ सकाळ NiE NEWSPAPER IN EDUCATION

# विक्रमांची अजब दुनिया

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.



## जगातील सर्वांत उंच कुत्रा

**झ्यूस या कुत्र्याची जगातील सर्वांत उंच कुत्रा म्हणून नोंद करण्यात आली आहे. अमेरिकेच्या टेक्सास भागातील बेडफोर्ड इथं हा विश्वविक्रम गेल्या वर्षी नोंदवण्यात आला होता.** त्या वेळी झ्यूसचं वय अवघ्या दोन वर्षांचं होतं. त्याची उंची १.०४६ मीटर म्हणजेच ३ फूट ५ इंच इतकी आहे. तो ग्रेट डेन या प्रजातीचा असून, उंची हेच या प्रजातीचं वैशिष्ट्य आहे. ब्रिटनी डेव्हिस नावाच्या एका तरुणीकडे हा कुत्रा असून, ती आणि तिचा भाऊ मिळून त्याचं पालनपोषण करत आहेत. तिला लहानपणापासूनच कुत्रे पाळायला आणि त्यांच्याशी खेळायला आवडतं. झ्यूस केवळ दोन महिन्यांचा असताना तिनं त्याला घरी आणलं होतं, तेव्हाही त्याची उंची इतर कुत्र्यांच्या मानानं जास्त होती.



## अबब! किती मोठा टेलिफोन!

**आपल्या घरात टेबलावर ठेवला जाणारा छोटा लँडलाइन टेलिफोन तुम्ही पाहिला असेलच. आता तो जाऊन मोबाइल आले असले, तरीही अद्याप काही घरांमध्ये किंवा विशेषतः कार्यालयांमध्ये टेलिफोन असतोच.** मात्र, जगातला सर्वांत मोठा टेलिफोन कसा आहे ते तुम्हाला ठाऊक आहे का? नेदरलँड्समध्ये एका प्रदर्शनात जगातील सर्वांत मोठा टेलिफोन ठेवण्यात आला होता. तो ८ फूट उंच, १९ फूट लांब आणि साडेतीन टन वजनाचा होता. त्याला क्रेनच्या साह्यानेच उचलण्यात येत होते. विशेष म्हणजे, त्यावरून फोनही लावता येतो बरं का! त्यामुळेच त्याला 'जगातील सर्वांत मोठा चालू स्थितीतील (ऑपरेशनल) टेलिफोन' असं म्हटलं गेलं आहे.



## नऊ सेकंदात तीन खिडक्या स्वच्छ

**मित्रांनो, दिवाळीनिमित्त तुम्ही नुकतीच घराची स्वच्छता केली असेल. त्यासाठी आई-बाबांनाही मदत केली असेल. त्यामुळे स्वच्छता करायला बराच वेळ लागतो हे तुमच्या लक्षात आलं असेलच;** पण ब्रिटनमध्ये टेरी बुरोस नावाच्या एका व्यक्तीनं तीन मोठ्या खिडक्या अवघ्या ९ सेकंदात स्वच्छ करून स्वतःच्या नावावर विश्वविक्रम केला आहे. ब्लॅकपूल इथं खिडक्या स्वच्छ करण्याची स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामध्ये हा विक्रम झाला. स्पर्धेत बुरोस यांनी ४५ बाय ४५ इंचाच्या तीन खिडक्या स्वच्छ केल्या होत्या.

## कागदी हत्तींचा मोठा कळप




कागदापासून विविध कलाकृती साकारण्याच्या कलेला 'ओरिगामी' असं म्हणतात. तुम्हीदेखील शाळेत किंवा आई-बाबांकडून कागदापासून विविध कलाकृती करण्यास शिकत असालच. मात्र, तुम्हाला माहितीय का, न्यूयॉर्क शहरातील ब्रॉंक्स प्राणीसंग्रहालयात वन्यजीव संवर्धन सोसायटीच्या वतीने ओरिगामीत साकारलेल्या हत्तींच्या कलाकृतींचं एक मोठं प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. यामध्ये हत्तींच्या सुमारे ७८,५६४ कलाकृतींचा समावेश करण्यात आला होता. हत्तींच्या संरक्षणाच्या दृष्टीनं जागृती व्हावी, या उद्देशानं हा उपक्रम घेण्यात आला होता.



स्क्रीन टाइम

द स्पायडरविक क्रॉनिकल्स



### कशासाठी बघायचा चित्रपट?

- मुलांमध्ये साहस व कल्पनाशक्ती निर्माण होण्यासाठी उत्तम चित्रपट.
- गोष्ट किती रंगवता येते, याचे उत्तम उदाहरण यातून मिळते.
- भीतिदायक असला तरी भीती कमी व्हावी म्हणूनही हा चित्रपट पाहिला जातो.

# कल्पनाशक्तीला आव्हान देणारी गोष्ट

**मित्र-मैत्रिणींनो, तुम्हाला जादूई प्रयोग करणारे चित्रपट आवडतात का? आवडत असतील तर 'द स्पायडरविक क्रॉनिकल्स' हा चित्रपट नक्की पाहा. हळूहळू कथा उलगडत जाणारा आणि प्रेक्षकांची उत्कंठा वाढविणारा हा चित्रपट तुम्हाला नक्कीच आवडेल. तुमच्याच वयाची मुलं एका जादूई रहस्यमय पुस्तकाचे कसे संरक्षण करतात याची कथा या चित्रपटात पाहायला मिळेल.**

**चित्रपटाची गोष्ट :**

टोनी डीटरलिझी आणि होली ब्लॅक यांच्या 'द स्पायडरविक क्रॉनिकल्स' या पुस्तक मालिकेवर बेतलेला चित्रपट म्हणजे 'द स्पायडरविक क्रॉनिकल्स'. हा चित्रपट २००८ मध्ये प्रदर्शित झाला. अमेरिकन काल्पनिक चित्रपट म्हणून याला ओळखले जाते. जादूई पुस्तकाच्या रक्षणासाठी झटणाऱ्या तीन भावंडांची कसरत यात पाहायला मिळते. यामध्ये बरेच भीतिदायक प्रसंग असून कदाचित ते प्रसंग पाहून तुम्हाला भीतीही वाटू शकते. पण, तुम्हाला भीतीचे चित्रपट आवडत असतील हा चित्रपट तुमच्यासाठी अगदी योग्य आहे. काय असते त्या जादूई पुस्तकात? ते पुस्तक राक्षसाच्या हातात पडते का ? तो त्या पुस्तकाचा कसा वापर करतो किंवा मुले ते पुस्तक पुन्हा मिळविण्यात यशस्वी होतात का अशा अनेक प्रश्नांसाठी हा चित्रपट पाहणेच उत्तम.

**चित्रपटाची वैशिष्ट्ये :**

चित्रपटात अतिशय उच्च दर्जाचे ॲनिमेशन पाहायला मिळते. यामुळेच कदाचित चित्रपटाला व्हिज्युअल इफेक्ट सोसायटीने 'लाइव्ह ॲक्शन फीचर मोशन पिक्चरमधील उत्कृष्ट ॲनिमेटेड कॅरॅक्टर' या श्रेणीत नामांकन दिले आहे. उत्कृष्ट कौटुंबिक थ्रिलर म्हणून ओळखला जात असला तरी हा चित्रपट खरोखरच भीतिदायक आहे, त्यामुळे तो शक्यतो आई-वडिलांसोबतच पाहावा.

**चित्रपट amazon prime वर उपलब्ध आहे.**

माय रेसिपी

अळूच्या वड्या तुम्हाला खायला आवडतात ना ? चला तर मग आज आपण त्या बनवायलाही शिकू. डब्याला नेता येण्यासारखा हा पौष्टिक खाऊ आहे. शिवाय तेलाचा वापर कमी असल्याने घरातल्या सर्वांच्याच फायद्याचाही आहे.

## प्रयोग करा

अळूच्या पानाऐवजी पालकाचे पान वापरायला हरकत नाही. शिवाय तांदळाच्या पिठाऐवजी मक्याचे पीठही वापरता येईल.

# पौष्टिक अळू रोल्स

**साहित्य**

अळूची मोठी पाने, एक कप बेसन, दोन चमचे राजगिरा किंवा तांदळाचे पीठ, एक लहान चमचा पांढरे तीळ, पाव चमचा ओवा, तिखट-मीठ-आमचूर पावडर चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर

**कृती**

बेसन, राजगिरा पीठ, तीळ, तिखट, मीठ, ओवा, आमचूर पावडर सर्व एकत्र करून पाणी घालून घट्ट पीठ भिजवा. एक-एक पान पसरून त्यावर पीठाचे लेपन करून प्रत्येक पानाचा रोल बनवून घ्या. कोथिंबीर वडी वाफवतो तसे हे रोल कुकरमध्ये वाफवून घ्या. रोल शिजवल्यावर त्यांचे दोन-तीन तुकडे करा. हे असेच चिंचेची चटणी किंवा टोमॅटो चटणीबरोबर खाता येतात किंवा तेलात सुकी लाल मिरची, जिरे, कांदा यांची फोडणी करून त्यात हे रोल परता. वरून बारीक चिरलेली कोथिंबीर पेरा.

**कोणास फायद्याचे**

सर्व पदार्थ पौष्टिक असल्याने तसेच तेलाचा वापर कमी यामुळे सर्वांसाठी हा नाश्ता चांगला आहे. यात प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे सर्व काही थोड्या थोड्या प्रमाणात आहेत. स्थूल व्यक्तींनी किंवा कॅलरीजविषयी जागृत व्यक्तींनी रोल्स निव्वळ वाफवून घ्यावेत. काही घरांमध्ये वयाने मोठी मंडळी स्थूल असतात, तर लहान मुले बारीक असतात. अशावेळी मोठ्यांनी वाफवलेले रोल बाजूला काढावेत व मुलांना छान खरपूस तळून सॉसबरोबर खाण्यास द्यावेत. दोन वेगळे नाश्ते करण्याची गरज राहत नाही.



? ४) जगातील सर्वांत मोठा टेलिफोन कुठे आहे?

✓ ८) भारताने पहिला विश्वचषक २५ जून १९८३ रोजी जिंकला.

# हुशार आणि धाडसी छोटी आनंदी

धाडसी मुलांच्या कथा या नेहमीच प्रेरणादायी असतात आणि दूरचित्रवाणीवर कोणत्या ना कोणत्या माध्यमातून प्रसारित केल्या जातात. यातूनच नव्या पिढीसमोर आदर्श उभा राहतो. भारतीय व्यंग्यपटाच्या दुनियेत 'छोटी आनंदी' ही अशीच धाडसी मुलीवरची मालिका.



## प्रेरणादायी संकल्पना

कोणत्याही लहान मुलाचे एखादे धाडस पाहून आपण कौतुक करतोच. कारण त्यांचे बौद्धिक चातुर्य भल्याभल्यांना बुचकळ्यात पाडणारे असते. अशा मुलांचे कौतुक व्हावे आणि इतरांना प्रेरणा मिळावी यासाठी अचाट कामगिरी करणाऱ्या मुलांना सरकारकडून दरवर्षी पुरस्कार दिला जातो. जीव धोक्यात घालून, प्राणाची बाजी लावत त्यांनी धाडसी कामगिरी बजावलेली असते. हिंस्र प्राण्यांपासून लहान मुलांचा जीव वाचवणे, नदीत बुडणाऱ्या भावंडांना सुरक्षित बाहेर काढणे यांसारख्या कार्यातून ते जगाचे लक्ष वेधून घेतात. अशाच संकल्पनेवर बेतलेली कार्टून मालिका म्हणजे छोटी आनंदी होय.

## २०१६ मध्ये प्रदर्शित

छोटी आनंदी पात्र काल्पनिक असले तरी लहान मुलांच्या कल्पकतेचे आणि साहसाचे यामध्ये प्रतिबिंब दिसते. २०१६ मध्ये प्रदर्शित झालेली छोटी आनंदी ही हिंदी भाषिक ॲनिमेटेड टेलिव्हिजन मालिका आहे. त्याची निर्मिती 'स्फीयर ओरिजन्स'मार्फत करण्यात आली. या मालिकेचा प्रिमिअर १७ जानेवारी २०१६ आणि १० एप्रिल २०१६ रोजी झाला.

## फिक्की बाएएफ पुरस्कार

देवयानी दगावकरने आनंदीच्या पात्राला आवाज दिला आहे. फुली ही आनंदीची सर्वांत जवळची मैत्रीण असून ती भोळसटपणामुळे आणि प्रेमळ स्वभावामुळे सर्वांना आकर्षित करत असते. नट्टू हा स्पर्धक असून तो नेहमीच आनंदीला मागे टाकण्याचा प्रयत्न करत असतो. तसेच तिला सतत विरोध करत असतो. छोटी आनंदी या मालिकेने २०१६ मध्ये न्यू ॲनिमेशन एंट्रेट श्रेणीत फिक्की बाएएफ पुरस्कार जिंकला आहे.

## धम्माल उडविणाऱ्या गोष्टी

छोटी आनंदीच्या प्रत्येक भागात वेगवेगळे कथानक असून ती कथा भागाच्या शेवटी समाप्त होते. प्रत्येक भागात छोटी आनंदी आणि तिच्या मित्रांची धम्माल पाहावयास मिळते. या मालिकेचे नेतृत्व छोटी आनंदी करताना दिसते. आनंदी ही आपल्या धाडसाने अपप्रवृत्तीवर मात करत असते. ती प्रत्येक भागात प्रेक्षकांना संदेश देते आणि त्यातून आपण विचार करण्यास प्रवृत्त होतो.

## साहसी आनंदी

छोटी आनंदी ही एक आठ वर्षांची हुशार आणि खट्याळ मुलगी. चार मित्र नट्टू, चिक्कू, फुली आणि चंपा यांच्यासमवेत ती राहत असते. ते एकत्र येऊन गट तयार करतात. हा गट अडचणीच्या काळात साहस दाखवतो. धार्मिक वृत्तीची आणि साहसी प्रवृत्तीची आनंदी खूप बुद्धिमान दाखविली आहे. तिच्याकडे प्रत्येक समस्येचे उत्तर असते.



## नायकाचे नाक वाकडे कशामुळे ?


आनंदी आणि तिच्या टीमच्या धाडसी कहाण्या वाळवंटात असलेल्या गावाभोवती फिरतात. प्रत्येक भागांत गावाच्या समस्या दाखविल्या असून कधी त्या सोप्या तर कधी किचकट वाटत असतात. गावातील लोकांना मदत करणे, चुकीचे काम करणाऱ्यांना वठणीवर आणणे, प्रत्येक ठिकाणी मुलींना आदर्श म्हणून प्रस्थापित करणे या गोष्टी दाखविल्या आहेत. एकदा छोटी आनंदीच्या गावात चित्रपटाची शूटिंग असते. चित्रपटाचा नायक मोटारीतून उतरताच गावात जल्लोष होतो. सर्वजण घायाळ होतात आणि स्वाक्षरी घेण्यासाठी आतुर होतात. परंतु छोट्या आनंदीला एक प्रश्न पडतो की नायकाचे नाक वाकडे कशामुळे आहे? काहीतरी गडबड आहे... या प्रश्नाची उकल करण्याच्या कामात छोटी आनंदी गुंतते. यातून रहस्य उलगडत जाते. अशा गमतीशीर कथा प्रेक्षकांचे मनोरंजन करतात.

---

**असं का?...**

डॉ. दीप्ती सिधये

## पदार्थांची चव कशी कळते?



**मित्र-मैत्रिणींनो, आपल्याला एखादा पदार्थ आवडतो असं आपण म्हणतो म्हणजेच आपल्याला त्या पदार्थांची चव आवडते. चवी वेगवेगळ्या प्रकारच्या असतात.** वेगवेगळ्या चवी आपल्याला कळतात तरी कशा? आपल्याला चवीची ओळख करून देण्यात महत्त्वाचा वाटा असतो तो 'जीभ' या ५ ज्ञानेंद्रियांपैकी एक आणि पूर्णपणे स्नायूंचा बनलेल्या अवयवाचा. जिभेवर असलेल्या रुचिकलिका (टेस्ट बड) या विशिष्ट ग्रंथी आपल्याला चवीची जाणीव करून देतात. गोड, आंबट, खारट आणि कडू अशा वर उल्लेख केलेल्या चार मूलभूत चवींची संवेदना जिभेवर वेगवेगळ्या ठिकाणी होते. गोड चवीची संवेदना जिभेच्या टोकाला होते. आंबट आणि खारट तिच्या बाजूला, तर पाठीमागच्या बाजूला कडू चवीची संवेदना होते. नाकाच्या वरच्या भागातील रिसेप्टर्समध्ये विशेष पेशी असतात ज्या आपल्याला वास घेण्यास मदत करतात, त्या मेंदूला संदेश पाठवतात. तुमच्या लक्षात येईल की, जेव्हा तुम्हाला सर्दी किंवा ॲलर्जी असते आणि नाक चोंदलेले असते, तेव्हा अन्नाची चव लागत नाही. कारण, तेव्हा हे रिसेप्टर्स मेंदूला सूचित करून चवीची संवेदना निर्माण करण्याचं काम नीट करू शकत नाहीत.

## २१ जून हा सर्वांत मोठा दिवस का?




**दोस्तांनो, आपला भारत देश उत्तर गोलार्धात आहे. आपणा सर्व उत्तर गोलार्धवासीयांसाठी आजचा दिवस अगदी खास आहे.** आज २१ जून आहे आणि उत्तर गोलार्धात २१ जून हा वर्षातला सगळ्यात मोठा दिवस असतो आणि तेव्हाची रात्र ही सगळ्यात छोटी रात्र असते. तुम्हीही हे निरीक्षणाद्वारे सिद्ध करू शकाल. रोजच्या वर्तमानपत्रात आपल्या गावातल्या सूर्योदय आणि सूर्यास्ताची वेळ दिलेली असते. तुमच्या लक्षात येईल की, जसे जसे आपण २१ जूनकडून २२ डिसेंबरकडे जातोय तसा तसा दिवसाचा कालावधी कमी कमी होत जातो आणि रात्रीचा कालावधी वाढत जातो. २२ डिसेंबरला सगळ्यात छोटा दिवस असेल आणि सगळ्यात मोठी रात्र. पुन्हा २२ डिसेंबर पासून २१ जूनकडे जाताना परिस्थिती विरुद्ध होईल. दिवसाचा कालावधी वाढत जाईल आणि रात्रीचा कालावधी कमी होईल आणि अर्थातच २१ जूनला दिवसाचा कालावधी सगळ्यात जास्त असेल आणि रात्रीचा सगळ्यात कमी. या मागचं कारण म्हणजे पृथ्वी चा झुकलेला अक्ष. पृथ्वी सूर्याभोवतीच्या तिच्या कक्षेच्या तुलनेत २३.५ अंशांकडे झुकलेली असते. पृथ्वीच्या परिभ्रमण अक्षाच्या अक्षीय झुकण्यामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावर दिवस आणि रात्रीच्या लांबीमध्ये ऋतूनुसार फरक होतो. याचा परिणाम एका वर्षाच्या कालावधीत सूर्यकिरणांच्या तीव्रतेत बदल होतो, परिणामी दिवस आणि रात्रीच्या वेळेत बदल होतो.

? ५) छोटी आनंदी मालिका सर्वप्रथम कधी प्रदर्शित झाली?

✔ २) नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कटक येथे झाला.

# Situations in a RESTAURANT

## Situation 1: Arriving at the Restaurant

**Option 1**

**HOST :** "Good evening. Do you have a reservation?"

**YOU :** "Yes, we have a reservation under the name of Joshi."

**Option 2**

**HOST :** "Good evening. How can I help you?"

**YOU :** "Hi, we don''t have a reservation. Is there a table available for two?"

## Situation 2: Ordering Food

**Option 1**

**WAITER :** "Are you ready to order?"

**YOU :** "Yes, I''d like the Misal Pav, please."

**Option 2**

**WAITER :** "What can I get for you?"

**YOU :** "Could I have the Sabudana Khichdi? And can I add a Koshimbir with that?"

## Situation 3: Dealing with a Problem

**Option 1**

**YOU :** "Excuse me, I ordered my Vada Pav spicy, but this is not spicy enough."

**WAITER :** "I apologize for that. Let me take it back to the kitchen and get you a spicier one."

**Option 2**

**YOU :** "I''m sorry, but this Misal Pav is cold."

**WAITER :** "I''m very sorry about that. I''ll have a fresh plate brought out right away."



## WORD SEARCH PUZZLE

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| R | P | E | G | A | S | U | S | E | U |
| A | H | A | V | D | R | A | G | O | N |
| W | O | R | A | W | W | P | H | G | I |
| M | E | R | M | A | I | D | O | R | C |
| O | N | B | P | R | T | N | S | I | O |
| N | I | E | I | F | C | P | T | F | R |
| S | X | R | R | Y | H | O | O | F | N |
| T | K | Y | E | T | I | R | N | I | A |
| E | L | F | E | L | A | C | B | N | K |
| R | N | A | F | A | I | R | Y | E | R |



•Dragon •Orc •Monster
•Unicorn •Fairy •Witch
•Elf •Mermaid •Phoenix
•Ghost •Vampire •Yeti
•Dwarf •Pegasus •Griffin

# LETTER WRITING

**Formal Letter to a Teacher / Principal :** Seeking permission to represent the school in a regional or national competition.

### Introduction

**Example One :** Dear Principal [Principal''s Name] Madam/Sir,
With utmost respect, my name is Rekha/Rahul Joshi, and I am a student in Class 8 under your esteemed guidance. I am writing to request your kind permission to represent our school in a regional science competition.

**Example Two :** Dear Principal [Principal''s Name] Madam/Sir,
I hope this letter finds you in good health. My name is Rekha/Rahul Joshi, and I am a student in Class 8. I am reaching out to seek your approval to participate in a national level debate competition on behalf of our school.

### Body


**Example One :** As informed, the regional science competition is scheduled to take place from the 1st of July to the 3rd of July in [City Name]. This event is a prestigious opportunity for me to showcase my skills and bring recognition to our school.

**Example Two :** The national debate competition will be held from the 5th of August to the 7th of August in [City Name]. My participation in this event will not only enhance my debating skills but also highlight our school''s commitment to extracurricular excellence.

### Conclusion

**Example One :** I assure you that I will make up for the missed classes and complete all assigned work. I will collect the notes from my classmates and seek your guidance if needed upon my return.

**Example Two :** I promise to cover all the missed lessons and assignments during my absence. I will stay in touch with my classmates to ensure I am up to date with the syllabus.



# How to appreciate someone?

दोस्तांनो, कौतुक केलेलं कोणाला आवडत नाही? प्रत्येकाला आपलं कोणी तरी कौतुक करावं असं वाटतंच असतं. मात्र, हे कौतुक करतानाही ते भरभरून केलं पाहिजे, बरोबर ना? तरच समोरच्याला जास्त छान वाटेल. त्यामुळे आज आपण अशी काही वाक्ये बघूया, की ज्यांचा उपयोग करून तुम्ही समोरच्याचं कौतुक करू शकता, त्याला दाद देऊ शकता.

- शीतल करंदीकर



1) तुझ्यासारखा इतका चांगला विचार क्वचितच कुणी करू शकेल.
= There is hardly anyone who can think so well like you.

2) तू जे करतोस ते प्रत्येकाला जमेलंच असं नाही.
= Not everyone will have the capacity to do, what you do.

3) तुमच्या घरी आल्यावर खूप प्रसन्न वाटतं.
= It feels so fresh when we come to your house.

4) तुझा स्वभाव खूप चांगला आहे.
= You are very good-natured.

5) तुमची मुलं अगदी उत्तम वर्तणूकीची आहेत.
= Your children are very well-behaved.

6) ती इतकी श्रीमंत असूनही अतिशय विनम्र आहे. = In spite of being rich, she is very modest.

7) त्यांचं वागणं अतिशय अदबशीर आहे.
= They are very respectful in their behaviour.

8) त्यांना त्यांच्या श्रीमंतीचा आजिबात गर्व नाहीये.
= They are not at all proud of their wealthiness.

9) ते सगळ्यांनाच आपल्यामध्ये किती छान सामावून घेतात.
= They accommodate everyone so well in their group / family.

10) तुझ्या पुढकरामुळेच हे सर्व शक्य झालं.
= This was all possible only because of your initiative.

11) ते सर्वांना समान संधी देतात.
= They give equal opportunity to everyone.

12) या सगळ्याचं आयोजन करणं सोपं नव्हतं, पण तू करून दाखवलंस.
= It was not easy to arrange all this, but you made it possible.

13) आपण सगळे उभं राहून यांच्यासाठी टाळ्या वाजवू या.
= Let us all give him / them a standing ovation.

*बघा, आपण किती निरनिराळ्या प्रकारे इतरांचं कौतुक करू शकतो ते. आता तुम्हाला हे इंग्लिशमध्येदेखील जमेल. गंमतपाठ म्हणून या वाक्यांचा तुम्ही भरपूर सराव करा आणि आपल्याभोवती असणाऱ्यांचं कौतुक करून तर पाहा! तेही तुमचं कौतुक करतील आणि तुम्हाला छान वाटेल.*

STORY

# The Enchanted Banyan Tree

In the heart of a small Indian village, there was an ancient banyan tree. It was said to be enchanted, but no one had ever seen its magic—until one extraordinary day. Meera, a curious and brave girl in grade 9, loved to explore. She often visited the banyan tree, fascinated by its sprawling roots and thick, leafy canopy. One afternoon, as the sun dipped below the horizon, Meera noticed a soft glow emanating from the tree''s hollow.

"What''s that light?" Meera wondered aloud.

As she approached, the light grew brighter. Suddenly, a small figure emerged from the hollow. It was a tiny, glowing fairy with wings that shimmered like the morning dew.

"Hello, Meera," the fairy said in a melodic voice. "I am Tara, the guardian of this tree."

Meera''s eyes widened. "A fairy! I never knew you were real!" Tara smiled. "This banyan tree is enchanted. It has the power to grant one wish to those pure of heart."

Meera thought for a moment. She remembered the drought that had plagued her village for months, causing crops to wither and the river to dry up. "Can you make it rain, Tara? Our village desperately needs water," Meera pleaded.

Tara''s wings fluttered gently. "A noble wish, indeed. But remember, magic always comes with a price."

Meera nodded. "I understand. I''m willing to do whatever it takes." Tara raised her tiny hands, and a gentle breeze swirled around the tree. Leaves rustled, and a soft chant filled the air. Suddenly, dark clouds gathered in the sky, and rain began to pour down, soaking the parched earth. The villagers rejoiced, dancing in the rain and thanking Meera for her bravery.

As the rain continued to fall, Tara spoke once more. "Meera, you have proven your courage and selflessness. The tree''s magic will always be here for those in need. But remember, true magic lies in the goodness of your heart."

Meera smiled, feeling a warm glow inside her. She knew that she had discovered something far more precious than magic—the power of kindness and selflessness. And so, the enchanted banyan tree continued to stand tall, a symbol of hope and magic in the heart of the village.

# Father and Son



Finally, the father agreed. The son placed the cat in a bag and carried it home.



He gave the cat milk and food and took care of it. He was happy.



One day the son at began to play with the ball. The cat tried to snatch it. The son's hand was wounded from the cat's nails.



The father came running. He applied medicine and bandaged the wound. "Father, you were right.I made a mistake," The son said.
Moral: Disobeying the elders can get you in trouble.

# Part of speech



Shailesh Barge

Dear friends,

When I was in school, I too liked to learn new things. When we learn something new, we feel happy, don''t we? And if the learning is easy and interesting, we become happier, right? My friends, I assure you every time, you learn new concept here, it will be easier as well as interesting. But for that I request your consistent reading. We are going to start a journey to the destination called ENGLISH GRAMMAR. By the way, this JOURNEY WILL BE MORE BEAUTIFUL THAN THE DESTINATION ITSELF.

In our Journey, we will come across many milestones. A Part of Speech is one of them, rather the first big milestone. What is part of Speech? A Part of Speech is a category of words. It shares syntactic, or morphological behaviour and semantic properties, such as noun or verb. Yes, I know there came some speed breakers here. (Let''s call a new concept a Speed Breaker.) Here we will slow down to understand the new concepts.

Syntax (syntactic) is the system of rules for the structure of a sentence. In short, it is about WORD ORDER of sentence. Morphological means about different forms of words. Morphology is a study of words, their forms. Ex. Child-Children, blood-bleed, Play- Played ,etc. Lastly ,Semantics is the study of meaning in language. It studies the relationship between words and their meanings. For example, home - abode. They mean the same but they are used in different contexts. We will continue this study of verbs in the next article.

GRAMMAR BITE

# explore the PRESENT PERFECT TENSE

Let''s explore the present perfect tense – it''s like a time machine that connects the past to the present!

**Story Time!**
Imagine you have a special diary that tells stories about things happening from the past until now. That''s what the present perfect tense does in English!

**Formation :** The present perfect tense is formed with "has" or "have" (depending on the subject) followed by the past participle of the verb.

**Examples :**

- Sarah has eaten ice cream. (She finished eating recently.)
- We have visited the museum. (We went there at some point before now.)
- He has read three books this month. (He finished reading recently.)

**Use :** For actions that started in the past and are still true now:

**Example :** She has lived here all her life.
For experiences or things, you have done at some point in your life:

**Example :** I have just finished my homework.

**Quick Tip :** Use "has" with he, she, or it, and "have" with I, you, we, or they. The present perfect tense helps you talk about past actions that are important in the present.

## सुभाषित

**साम्नैव यत्र सिद्धिर्न तत्र दण्डो बुधेन विनियोज्यः ।**
**पित्तं यदि शर्करया शाम्यति कोऽर्थः पटोलेन ।।....**

सौम्य उपायांनी जेव्हा चिकित्सा होऊ शकते तेव्हा विचारी लोकांनी तीव्र उपचार करू नयेत. वाढलेल्या पित्ताचे शमन जर साखरेने होऊ शकत असेल तर पटोलाचा (पटोल हे एक पित्तशामक कडू औषध आहे) उपयोग का बरे करावा?

# संस्कार

**आनंददायी शनिवार**

## सुविचार

आपण कोण आहोत हे परिक्षेवाचून काळात नाही,. परीक्षा आपली पाळेमुळे खणून आपण कोण आहोत हे दाखवितात.

## गीता श्लोक

**नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव||**

हे अच्युता, तुझ्या प्रसादाने माझा मोह नष्ट झाला आणि मला माझ्या कर्तव्य धर्माची स्मृती झाली. मी आता नि:संदेह झालो आहे. तुझ्या म्हणण्याप्रमाणे आता मी माझे कर्तव्य म्हणजेच युद्ध करायला तयार आहे.

## दिनविशेष




**२१ जून**

**१९९८ :** फ्रॅंकफर्ट बुद्धिबळ महोत्सवात विश्वनाथन आनंदकडून फ्रिट्झ-५ या संगणकाचा पराभव.



**२२ जून**

**२००७ :** १९४ दिवस १८ तास पूर्ण करून सर्वाधिक काळ अंतराळात राहून अंतराळवीर सुनीता विल्यम पृथ्वीवर परत आल्या.



**२५ जून**

**१९८३ :** क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात खेळला गेला. वेस्ट इंडिजचा हा सलग तिसरा विश्वचषक अंतिम सामना होता. भारताने आपला पहिला अंतिम सामना खेळताना वेस्ट इंडिजचा पराभव करून पहिला विश्वचषक जिंकला.

बोधकथा

प्रशांत सरुडकर



## प्रामाणिक मुंगूस


**प्राचीन काळची गोष्ट आहे. एका नगरात देवशर्मा व त्याची पत्नी आनंदाने राहत होते. त्यांना एक गोंडस बाळ झाले. त्याचदरम्यान घराजवळ त्यांना एक मुंगसाचे पिल्लू सापडले. तेही अतिशय गोंडस होते.** दोघाही पती-पत्नीने त्याचा सांभाळ स्वतःच्या मुलाप्रमाणेच केला. त्याला जीव लावला. मुंगसाचे पिल्लू त्यांच्या घरात आनंदाने खेळायचे, बागडायचे. लहान बाळाजवळ येऊन बसायचे. ते मुंगूस त्यांच्या कुटुंबातील घटकच झाले होते. एके दिवशी देवशर्मा कुठेतरी परगावी गेला. त्याची पत्नी पाणी आणण्यासाठी घराबाहेर पडली. घरामध्ये छोटेसे बाळ आणि मुंगूस होते. मुंगसाला बाळाबरोबर खेळायची सवय होती. तेवढ्यात एक मोठा नाग त्या घरात शिरला. बाळ जिथे झोपले होते, त्या दिशेने तो निघाला. मुंगसाने नाग पाहताच त्याच्यावर झडप घातली आणि थोड्याच वेळात त्याला मारून टाकले. मुंगसाच्या तोंडाला नागाचे रक्त लागले. आपण बाळाचे प्राण वाचवले, हे बाळाच्या आईच्या लक्षात यावे म्हणून ते मुंगूस दाराजवळ जाऊन तिची वाट पाहू लागले. थोड्याच वेळात ती पाणी घेऊन आली. पाण्याची कळशी तिच्या डोक्यावर होती. दरवाजा उघडताच तिला मुंगूस दिसले. त्याच्या तोंडाला रक्त लागले होते. तिला वाटले या मुंगसाने आपल्या बाळावर हल्ला केला. मुंगसाच्या तोंडाला लागलेले रक्त बाळाचेच आहे. अतिशय दु:खाने आणि रागाने तिने पाण्याची कळशी मुंगसावर टाकली. मुंगूस गतप्राण होऊन पडले. धावतच देवशर्माची पत्नी आपल्या बाळाकडे गेली. बाळ आनंदाने मुठी तोंडात घालून खेळत होते. बाळाच्या शेजारी मुंगसाने मारलेला नाग तिला दिसला. मुंगसाने आपल्या बाळाचे प्राण वाचवले, पण गैरसमजाने तिच्या हातून मुंगूस मारले गेले. एकंदर घटना लक्षात येताच तिला अतिशय वाईट वाटले. मुंगसाला मांडीवर घेऊन तिने हंबरडा फोडला.

**तात्पर्य :** **कोणतीही कृती करताना भावनेच्या भरात करू नये. पूर्ण विचारांती करावी.**

टाइम मॅनेजमेंट

**सुप्रिया पुजारी,** लाइफ कोच, समुपदेशक

## भावनांचा प्रेशर कुकर



**प्रत्येकाला भावना असतात आणि त्या व्यक्त करणे खूप महत्त्वाचे असते. प्रेशर कुकरप्रमाणे तुमच्या भावनांचा विचार करा. वाफ बाहेर पडू न देता तो गरम करत राहिल्यास त्याचा स्फोट होऊ शकतो.** आपल्या भावनांच्या बाबतीतही असेच घडते. जर आपण आपल्या भावना दीर्घ काळ व्यक्त नाही केल्या, तर त्याचे अनेक परिणाम आपल्याला दिसून येतात. उदा : आनंद व्यक्त केल्याने वाढतो असे म्हणतात. सकारात्मक भावना व्यक्त नाही केल्या, तर आपल्या आनंदात सहभागी होणारे कोणीच उरत नाही. तसेच नकारात्मक भावना मनात साठवून ठेवल्यास त्या चुकीच्या ठिकाणी, चुकीच्या पद्धतीने बाहेर पडतात. स्वतः बरोबर इतरांवरही त्याचा परिणाम होतो.

आता रियाची गोष्ट पाहूया. रिया सहसा खूप आनंदी आणि ऊर्जेने भरलेली असायची. परंतु शाळा आणि मित्रांमुळे ती उदास राहायची. याबद्दल बोलण्याऐवजी रियाने तिच्या भावना स्वत:कडेच ठेवल्या. एके दिवशी क्लास प्रोजेक्टदरम्यान ती खूप निराश झाली आणि रडू लागली. तिचे मित्र आणि शिक्षक काळजीत होते. कारण त्यांना माहीत नव्हते की, रिया इतकी तणावग्रस्त आहे. शेवटी भावना शेअर केल्यानंतर रियाला खूप बरे वाटले. तिच्या मैत्रिणींनी तिचे ऐकले आणि तिला पाठिंबा दिला. परिणामी तिला एकदम छान वाटले.

तुमच्या भावना शेअर करणे, मग ते आनंदी असो वा दु:खी, हे प्रेशर कुकरमधून वाफ सोडण्यासारखे आहे. ते तुम्हाला हलके वाटण्यास मदत करते आणि मानसिक स्फोट होण्यापासून वाचवते.

**यासाठी काही टिप्स पाहूया :**

**१. भावना व्यक्त करण्याचे साधन तुम्ही शोधा. मग तो खेळ, चित्रकला, लिहिणे किंवा जवळच्या व्यक्तीसोबत शेअर करणे.**

**२. कोणत्या भावना सातत्याने अनुभवत आहात ते तपासा.**

**३. डायरी लिहिण्याने मन हलके होण्यास मदत होते.**

**लक्षात ठेवा :** **भावना व्यक्त केल्यास आपले मन एकदम फ्रेश राहते!**

## भारताचा मॉन्सून सर्वात शक्तीशाली

हाक वसुंधरेची

**मैत्री मैत्रिणींनो नुकताच पावसाळा सुरू झाला आहे. काही ठिकाणी ढगफुटी झाल्याचा, पूर आल्याच्या किंवा दरडी कोसळण्याच्या बातम्याही सध्या वाचतो आहोत.**

पावसाळ्याला अरेबिक भाषेत मॉन्सून म्हणतात. हा शब्द मौसम या शब्दापासून आलेला आहे याचा अर्थ वाऱ्याच्या दिशेत बदल होणे, असा आहे. अरबी लोक व्यापारासाठी भारतात येण्यासाठी पवन ऊर्जेचा वापर त्यांची जहाजे हाकारण्यासाठी करत. त्यामुळे वाऱ्याच्या दिशेचे त्यांना महत्त्व असे. त्याचसंदर्भात मौसम या शब्दापासून हळूहळू त्याचा मॉन्सून असा उच्चार होऊ लागला. आता त्याचा अर्थ पावसाळा असाच असतो. भारतात मान्सूनचा कालावधी नेहमीच जून ते सप्टेंबर असा चार महिन्याचा असतो. भारत, आफ्रिका, दक्षिण पूर्व- चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, थायलंड, अमेरिका इत्यादी देशातील मॉन्सून सक्रिय आहेत. पण भारतातील मॉन्सून हा सर्वात जास्त शक्तिशाली आहे असे मानतात.

भारतातील डोंगर आणि त्यांचे एक विशिष्ट स्थान यांचे योगदान भारतीय मॉन्सून शक्तिशाली करण्यात आहे. उत्तरेला हिमालय, पूर्वेकडे आराकान योम आणि पटकाई डोंगर, पश्चिमेच्या बाजूला हिंदुकुश पर्वत, दक्षिणेकडे आणि पश्चिमेकडे अरबी समुद्र आणि पूर्वेला बंगालचा उपसागर पावसासाठी लागणाऱ्या बाष्पाचा भरपूर पुरवठा करतात. पूर्वेकडे आफ्रिकेच्या किनाऱ्यावर असलेले डोंगर आणि मादागास्कर येथील डोंगर यांच्यामधून आलेल्या पश्चिमी वाऱ्यामुळे एक झोत तयार होतो. त्याला 'लो लेवल जेट' असे म्हणतात. भारताच्या दक्षिण बाजूला आणि पश्चिम किनारपट्टीवर असलेल्या डोंगरांमुळे पश्चिम किनारपट्टीवर खूप पाऊस पडतो.

## उत्थित एकपादशिरासन

योग जीवन

**मनाली देव**

**हे बैठकस्थितीमधील तोलात्मक आसन आहे. प्रथम एकपाद शिरासनचा उत्तम सराव करावा. त्यानंतर उत्थित एकपाद शिरासनचा सराव सुरू करावा. मानेत पाय घालून साधारण २६ ते २७ आसने करता येतात.**

### असे करावे आसन

- प्रथम ताठ बसावे आणि दोन्ही पाय सरळ करावे. त्यानंतर सावकाश एक पाय गुडघ्यात वाकवावा व दोन्ही हाताच्या आधाराने मानेकडे घ्यावा.
- आपण प्रथम डाव्या पायांनी आसन कसे करायचे ते बघूया. डावा पाय गुडघ्यात वाकवावा व दोन्ही हाताच्या तळव्याने पाऊल पकडावे.
- त्यानंतर पाय हळूहळू वरच्या दिशेला म्हणजेच डोक्याकडच्या दिशेला घ्यावा.
- त्यानंतर हळूहळू डोक्यावरून मानेकडे घेण्याचा प्रयत्न करावा.
- मानेच्या इथे पाय गेल्यानंतर मान सरळ करावी व हात जोडून ताठ बसावे.
- चार ते पाच सेकंद ताठ बसल्यानंतर हात मांडीजवळ जमिनीवर टेकवावे व हाताची ताकद वापरून संपूर्ण शरीर हातावर उचलावे.
- शरीर वर उचलल्यानंतर श्वसन संथ सुरू ठेवावे व नजर स्थिर असावी.
- एका बाजूने आसन सोडले की, दुसऱ्या बाजूनेसुद्धा अशाच प्रकारे कृती करावी.

### लाभ

- या आसनाच्या सरावाने हाताची, मनगटाची ताकद वाढते. पोटातील इंद्रियांवर दाब येतो. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढते. पचनक्रिया सुधारते. तसेच, मांडीची लवचिकता वाढण्यासाठी मदत होते. एकाग्रता वाढते.



**काळजी :**


- **तोलात्मक आसन असल्याने अगदी सावकाश करावे. खूप झटका देऊन आसन उचलू नये किंवा खूप ताणून मानेत पाय घालू नये.**

## मुलांवर संस्कार करणारे पुस्तक

वाचू आनंदे

आपण झोपेत बघतो ती स्वप्ने नसतात, तर जी स्वप्न पाहिल्याने आपल्याला झोपच येत नाही त्यांना स्वप्न म्हणतात असं म्हणणारे डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनावरील हे सुंदर पुस्तक. डॉ. ए. पी. जे.अब्दुल कलाम म्हणजे भारताचे अकरावे राष्ट्रपती. यांच्या आदर्श आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची माहिती या पुस्तकातून मिळते. अमर चित्र कथांच्या माध्यमातून तयार करण्यात आलेले हे पुस्तक रोहन प्रकाशनने प्रकाशित केले आहे. वैज्ञानिक, लेखक, कवी, शिक्षक अशा अनेक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे डॉ. कलाम यांनी केलेले महत्त्वाचे कार्य, त्यांना आलेली संकटे आणि त्यातून मिळवलेला विजय या पुस्तकात मांडण्यात आला आहे.

त्यांना तरुणांच्या सामर्थ्यावर खूप विश्वास होता. तरुणांना योग्य मार्ग दाखवण्यासाठी ते कायमच प्रयत्नशील होते. उत्तुंग व्यक्तिमत्त्व असूनही त्यांचे पाय कायम जमिनीवर होते. त्यांच्या याच वाटचालीची गोष्ट या पुस्तकात वाचायला मिळते. मुलांवर संस्कार करायचे असतील, त्यांना विज्ञानाची आवड निर्माण करून त्यांच्यात जीवनावश्यक मूल्ये रुजवाचयची असतील तर हे पुस्तक मुलांना वाचायलाच द्यायला हवे. अवघ्या ६३ पानांचे छोटे परंतु प्रेरणादायी असे हे पुस्तक कष्ट, जिद्द, आत्मविश्वास, चिकाटी आणि सर्वधर्मसमभाव अशा अनेक पैलूंवर प्रकाश टाकते. विशेष म्हणजे संपूर्ण पुस्तक रंगीत चित्रांसह असल्याने कंटाळवाणे अजिबात वाटत नाही.





? ८) भारताने पहिला विश्वचषक कधी जिंकला?

✔ १) केशरच्या फुलाला क्रोकस सॅटिव्ह असे म्हणतात.

# घरच्या घरी प्रयोगशाळा...!

— अशोक तातुगडे

मित्र-मैत्रिणींनो, आज आपण दोन वेगवेगळ्या विषयांतले प्रयोग करणार आहोत. एक आहे पदार्थविज्ञान शास्त्रासंबंधी, तर दुसरा आहे वनस्पतिशास्त्राशी संबंधित. पावसाळ्यामुळे वनस्पतिशास्त्रातला प्रयोग मुद्दाम घेतला आहे. वनस्पतींच्या मुळांचा अभ्यास करताना त्यांच्या इतरही भागांचा म्हणजे पाने, फांद्या, खोड यांचाही अभ्यास तुम्ही करणं अपेक्षित आहे. हे दोन्ही प्रयोग तुम्ही आवर्जून करा. त्यासाठी मित्रांची मदत घ्या. यातून तुम्हाला कोणती निरीक्षणे मिळतात? त्यांची नोंद करा.




## दृष्टिसातत्याचा खेळ


मित्र-मैत्रिणींनो, आज आपण एका वैशिष्ट्यपूर्ण प्रक्रियेची माहिती करून घेणार आहोत. ही प्रक्रिया बरीच गुंतागुंतीची असते, पण त्यातली मूळ संकल्पना म्हणजेच दृष्टिसातत्य हे असते. ही प्रक्रिया आहे सिनेमा बनविण्याचे तंत्र. आपण सिनेमा बघतो, ती अनेक चित्रे एका लांब पट्टीवर(फिल्म) संग्रहित केलेल्या फोटोंची वेगाने केलेली हालचाल असते. त्यामुळे आपल्याला वेगाने फिरणारी वेगवेगळी चित्रे दिसण्याच्या ऐवजी एकच सलग हालचाल दिसते. हे कसे होते? ते आपण एका खूपच साध्या प्रयोगाद्वारे करून बघणार आहोत. तुम्हाला हा प्रयोग करताना खूप धमाल येईल.

**साहित्य :** अगरबत्ती, काडेपेटी.

**कृती :** हा प्रयोग आपण अंधारात केल्यास जास्त परिणामकारक होईल व आपल्याला मजा येईल. एक मोठी व जाड अगरबत्ती घ्या आणि ती काडेपेटीने पेटवा. अगरबत्ती नेहमीप्रमाणे टोकाला जळू लागेल. ती हातात धरून गोल-गोल फिरवा. आकृती पाहा. प्रथम छोट्या वर्तुळाकारात फिरवा व नंतर मोठ्या वर्तुळाकारात ती फिरवा.

**निरीक्षण व निष्कर्ष :** आपल्याला दिसेल की, आपण जर अगरबत्ती वेगात फिरविली, तर अगरबत्तीचे एक टोक दिसण्याचे ऐवजी आपल्याला आगीचे वर्तुळ दिसते. पण आपण जर अगरबत्ती हळू फिरविली, तर ते वर्तुळ दिसत नाही. असे का होते? एखादा पदार्थ आपल्या डोळ्यांसमोर असतो, तेव्हा तो आपल्याला दिसतो. हा पदार्थ बाजूला केल्यावरही त्याची प्रतिमा आपल्या दृष्टिपटलावर काही वेळा तशीच राहते. साधारणपणे एक नवमांश सेकंदापर्यंत. त्याच वेळी दुसरी प्रतिमा तयार झाली, तर त्या प्रतिमांची साखळी तयार होते आणि ती हलणारी वस्तू आहे असे वाटते. याच तत्त्वाचा उपयोग करून सिनेमाची फिल्म बनविली जायची. प्रत्येक सेकंदाला २४ पेक्षा जास्त प्रतिमांचा 'फोटो फिल्म'वर घेऊन ती फिल्म त्या वेगाने सरकते, तेव्हा आपल्याला हालचाल झाल्याचे दिसते व चलचित्र तयार होते.






## वनस्पतीच्या मुळांचे प्रकार

मित्र-मैत्रिणींनो, पावसाळा सुरू झाला की, शेतकऱ्यांची पेरणीची लगबग सुरू होते. त्यामुळे हा प्रयोग करण्याची संधी आता याच काळात आहे. यासाठी आवश्यक असलेला पावसाळा आता सुरू झाला आहे. आजच्या प्रयोगात आपण मुळांचे वेगवेगळे प्रकार कसे असतात? ते बघणार आहोत.

**साहित्य :** या प्रयोगासाठीचे साहित्य तुम्हाला कदाचित एकाच वेळी मिळणार नाही, पण जेव्हा संधी असेल, तेव्हा तुम्ही हे करून पहा. शेतामध्ये जायची संधी आली, तर तेथून किंवा आपल्या बागेमध्येही काही झाडे लावून त्यांची मुळे कशी असतात? त्यांची वाढ कशी होते? ते बघा. उदाहरणार्थ मिरची, वांगे, भोपळा यांची रोपे. या बरोबरच ज्वारी, भात, ऊस यांची रोपे व त्यांच्या मुळांचे आकार.

**निरीक्षण व निष्कर्ष :** साधारणपणे द्विदल धान्य प्रकारातील वनस्पती किंवा ज्या वनस्पतींच्या बीचे दोन भाग होतात अशा वनस्पतींमध्ये 'सोटमूळ' हा प्रकार आढळतो. या वनस्पतींच्या पानांचे निरीक्षण केल्यास त्यांची पाने जाळीदार व शिरा असलेली असतात. अशा वनस्पतींना फांद्याही असतात. मिरची, वांगी, भोपळा या वनस्पती या प्रकारात येतात. यांची मुळे 'सोटमूळ' या प्रकाराची असतात, म्हणजे एकच मुख्य मूळ असते व त्याच्या आजूबाजूला कमी लांबीची व जाडीची अनेक मुळे असतात.
ज्वारी, भात, ऊस या वनस्पती ज्यांना आपण एकदल वनस्पती म्हणतो - त्यांची मुळे 'तंतूमुळे' असतात. सर्व मुळे साधारण एकाच जाडीची असतात आणि त्यांना छोटी-छोटी तंतूमुळे असतात. या वनस्पतींना सहसा फांद्या नसतात.




## प्राण्यांची रिले ट्रेल

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

**दोस्तांनो, आता मस्त पावसाळा सुरू झाला आहे. अशा वेळी कमी जागेत घरातल्या घरातही खेळता येईल असा एक खेळ आपण पाहूया! या खेळासाठी काही कोन किंवा वाटी पेला असे साहित्य घ्यावे. एक आरंभरेषा आणि त्यापासून काही अंतरावर अंतिमरेषा आखून घ्यावी आणि त्यावर कोन ठेवावा.**

**कृती :**

- खेळाडूंचे २ गट करून घ्यावेत. गटनायकाने खेळाडूंना सूचना द्यायची आणि प्राण्याच्या नावाचा क्रम सांगायचा जसे बदक, ससा, उंट, खेकडा, बेडूक.
- **बदक (duck walk) :** दोन पायांवर बसून चालणे.
- **ससा (bunny hops) :** पाय गुडघ्यात वाकवून उड्या मारत जाणे.
- **उंट (camel) :** दोन्ही हात आणि दोन्ही पाय जमिनीवर ठेवून पार्श्वभाग उंच करून पाय ताठ ठेवून चालणे.
- **खेकडा (crab) :** उलट्या हातांवर कंबर उचलून चालणे.
- **बेडूक (frog jumps) :** दोन्ही हात आणि पावले जमिनीवर ठेवून गुडघे न टेकवता उड्या मारत जाणे.
- असेच अस्वल, साप, स्पायडर, अळी, वाघ असे प्राणीदेखील तुम्ही सांगू शकता.
- गटातील खेळाडूंनी त्या प्राण्यासारखे चालत जाऊन, तो कोन उचलून पळत परत यायचे आणि आपल्या गटातील खेळाडूला तो कोन द्यायचा. जो गट क्रम लक्षात ठेवून न चुकता, कोन न पाडता सर्वांत पहिले शर्यत पूर्ण करेल तो जिंकतो.

**कौशल्ये :** संपूर्ण शरीराची ताकद वाढते. हात पाय आणि विशेषतः मध्य शरीराची ताकद वाढते आणि तोल सुधारतो. समन्वय सुधारतो.




### थंड प्रदेशातील पदार्थ

केशर थंड प्रदेशात आढळते. ते जगातील सर्वांत महाग मसाल्यांपैकी एक असून, केशराला इंग्रजी मध्ये 'सॅफ्रॉन' असे म्हणतात. केशर हे गवतवर्गीय पीक असून, या पिकास समुद्रसपाटी पासून २००० ते २५०० मीटर उंचीचा थंड बर्फाळ हवामानाचा प्रदेश आवश्यक असतो. तसेच, पाण्याचा निचरा होणारी जमीन हवी असते. केशराच्या झुडपाची उंची १५ ते २५ सेंटिमीटर एवढी असते. त्याची पाने अरुंद आणि लांब असतात. ही झुडपे जगात भारत, स्पेन, इराण, इटली, जपान, रशिया, चीन या देशांत प्रामुख्याने आढळतात.

### गुणधर्म

केशराचा वास विशिष्ट, थोडासा उग्र आणि तरीही सुगंधी असचो. त्याच्या काड्यांचा आकार २ ते अडीच सेंमी. लांब असतो. नुसते केशर चवीला थोडे कडवट असते. पूर्ण कोरड्या न केलेल्या काड्या कागदावर टाकल्या तर त्या तेलकट वाटतात. दुधात केशर मिसळल्यावर त्याचा रंग पिवळसर होतो. मात्र, केशर पूर्णतः विरघळत नाही. ते अधिक मऊ होते.

### फायदे

- केशर आरोग्यासाठी चांगले असतेच, पण सौंदर्यासाठीही त्याचा विशेष फायदा होतो. केशराचा वापर बहुतेक गोड पदार्थ तयार करताना केला जातो.
- केशर मनास व बुद्धीस उत्तेजन आणणारे असून, त्यामुळे मेंदूचे आरोग्य उत्तम राहते.
- केशर हे वातशामक असून, प्रकृतीने उष्ण असल्याने दुधाबरोबर केशर घेतांना ते दोन ते तीन काड्याच घ्यावे. त्यापेक्षा जास्त घेऊ नये.
- केशराचा त्वचा, पोट, हृदय, मधुमेह इत्यादी विकारांवर, तसेच शक्तिवर्धक औषध म्हणून वापर करतात.


**कसे तयार होते केशर ?** केशर हा क्रोकस सॅटिव्हसच्या फुलापासून तयार केलेला मसाला आहे. ज्याला 'केसर क्रोकस' म्हणून ओळखले जाते. किरमिजी रंगाच्या फुलाच्या कंदापासून केशरकाड्या गोळा केल्या जातात आणि वाळवल्या जातात. त्यांचा वापर अन्नामध्ये आणि नैसर्गिक रंग म्हणून केला जातो.

### तुम्हाला हे माहीत आहे का?


- एक किलो केशरची किंमत साधारणतः तीन लाख रुपये एवढी असते.
- केशरात अ जीवनसत्त्व, फॉलिक ॲसिड, तांबे, पोटॅशिअम, कॅल्शिअम, मॅंगनीज, लोह, सेलेनियम, झिंक, मॅग्नेशिअम आणि इतरही काही पोषक घटक असतात. त्याशिवाय केशरात लाईकोपिन, अल्फा कॅटरीन, बीटा कॅरोटीन हे घटकही असतात. त्यामुळे केशरसेवन आरोग्यदायी असते.
- केशर घातलेला चहा प्यायल्याने महिलांच्या आरोग्याला विशेष लाभ होतो.

CYBER SECURITY
Net Protector
NPAV
Total Security
922.566.48.17
922.566.48.11
Mobile Security


नेमकी सावली ओळखा बरं.




डोकं चालवा, गणित सोडवा.





खालील चित्रात एकुण किती मासे आहेत मोजा बरं.




कोणत्या दोरीला हाड बांधलेलं आहे शोधा.




खालील चित्रातील दहा फरक ओळखा.



चित्र रंगवा



डोकं चालवा, गणित सोडवा.

1. 5 + ☐ + 2 = 12
2. 3 + 14 − 8 = ☐
3. ☐ − 9 + 4 = 7
4. 7 + 11 − ☐ = 10
5. 15 − ☐ − 6 = 3

# ज्वेल ऑफ कोकण

मित्रमैत्रिणींनो, इयत्ता चौथीमध्ये आपण सर्वांनीच कवी श्रीधर कृ. शनवारे यांची धीवर पक्षी ही कविता अभ्यासली असेल. तळ्याकाठी गाती लाटा, लाटांमध्ये उभे झाड! झाडावर धीवराची, हाले चोच लाल जाड! ही कविता ज्या धीवर पक्ष्यावर होती त्याच पक्ष्याची माहिती आज आपण पाहणार आहोत. या धीवराला इंग्रजीत किंगफिशर तर आपल्या भाषेत खंड्या म्हणतात. ज्वेल ऑफ कोकण म्हणूनही खंड्या सर्वदूर ओळखला जातो.

- अश्विनी इचके

भारतात खंड्याच्या एकूण **१२** प्रजाती आढळतात.





## क्लिक क्लिक

पाण्यावर आलेल्या झाडाच्या एखाद्या फांदीवर किंवा लव्हाळ्याच्या झुडुपावर बसून खंड्या भक्ष्य शोधत असतो. मधून आपले डोके हलवीत क्लिक क्लिक किंवा 'किल् किल्' असा आवाज काढतो. ओरडताना नेहमी शेपटाला झटका देतो. पाण्यात मासा दिसताच तिरकस सूर मारून मासा चोचीत पकडून तो आपल्या जागेवर येऊन बसतो व मासा गिळतो. हे त्याचे वैशिष्ट्य.

खंड्या जगभर आढळत असून त्याच्या **८०** पेक्षा जास्त जाती आहेत.

## ताशी ७० किमी

खंड्या दिसायला छोटा असला तरी पाण्यातला मासा दिसताच कमालीचा वेग धारण करतो. ताशी ४० किलोमीटरच्या वेगाने तो पाण्यात बुडी मारून आपली शिकार पकडू शकतो. एवढंच नव्हे तर ताशी साठ ते सत्तर किलोमीटरच्या वेगाने तो हवेत उड्डाण करू शकतो. खंड्याचे आयुष्य १० ते १५ वर्षे एवढे असून त्याचे मुख्य शत्रू हे कोल्हे, मांजर आणि साप हे आहेत .

खंड्या हा ॲल्सिडीनिडी या पक्षीकुलातील पक्षी आहे.

## प्युअर नॉनव्हेज

खंड्या हा प्युअर नॉनव्हेज पक्षी आहे बरं का. त्याला फळाफुलांमध्ये किंवा धान्यांमध्ये काहीही रस नाही. त्याला पोट भरण्यासाठी नॉनव्हेजच हवे असते. त्यात मासा तर खंड्याच्या आवडीचाच. खंड्या मासेमारीत पारंगत असल्यानेच त्याला किंगफिशर नाव पडले. याचे मुख्य खाद्यच मासे असल्यामुळे हा नेहमी तलाव, डबकी, नद्या यांच्या काठावर बसलेला आपल्याला दिसतो. पण समजा मासे नाहीच मिळाले तर तो काय उपाशी राहत नाही बरं का. छोटे किडे, लहान बेडूक खाऊनही तो पोट भरत असतो.

## चिमणीपेक्षा मोठा

खंड्या लांबून छोटा दिसत असला तरी तो चिमणीपेक्षा मोठा असतो. त्याच्या शरीराची लांबी साधारणपणे १८ सेंटीमीटर असते. डोक्याचा वरचा भाग निळा तर त्यावर आडव्या काळ्या रेषा असतात. खंड्याची पाठ एकदम चकचकीत निळी असते तर पंख हिरवट निळे असतात. त्याच्या डोक्याच्या दोन्ही बाजूंना विटकरी, निळा आणि पांढरा रंग असतो. त्यामुळे खंड्या दिसायला भलताच रुबाबदार दिसतो. त्याची हनुवटी आणि गळा पांढरा तर पोटाकडचा भाग विटकरी असतो. याउलट चोच शरीराच्या मानाने बरीच लांब, जाड, काळी आणि टोकदार असते बरं का. पाय आखूड व लाल रंगाचे आणि शेपूट लहान असते. विशेष म्हणजे नर आणि मादी दोघंही दिसायला सारखेच असतात.

## तिबोटी खंड्या

रायगड जिल्ह्याचा जिल्हापक्षी म्हणून तिबोटी खंड्याला ओळखले जाते. रायगड जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत तशी घोषणा करण्यात आली आहे. भारतात आढळणाऱ्या खंड्या पक्ष्यांच्या एकूण प्रजातींमधील तिबोटी खंड्या हा आकाराने सर्वांत लहान खंड्या आहे. या पक्ष्याचा समावेश स्थलांतरित पक्ष्यांमध्ये होत असला तरी तो केवळ प्रजननासाठी सह्याद्रीमध्ये येतो.

# मोगरा फुलला...

मित्र-मैत्रिणींनो, मोगऱ्याचा सुवास आपणा सर्वांच्या चांगलाच ओळखीचा आहे. सण-समारंभाला आई, ताई, वहिनी केसांत मोगऱ्याचा गजरा माळत असतील. देवांनाही पूजेच्या वेळी मोगरा वाहिला जातो. मोगऱ्याचं अत्तर खूप वापरलं जातं. काही जण हौशीने मोगऱ्याची उदबत्तीदेखील लावतात. चला तर, जाणून घेऊया या सुगंधी फुलाबद्दल...

## झाडाची माहिती

या झाडाची पाने साधी, समोरा-समोर किंवा कधीकधी त्रिदली, विविध आकारांची, बहुधा अंडाकार, गुळगुळीत असतात. फुले पांढरी, फार सुवासिक, एक-एकटी वा तीन फुलांच्या गुच्छाने येतात. मोगऱ्याच्या शारीरिक लक्षणांत खूपच विविधता आढळते. त्यामुळे त्याचे पुष्कळ प्रकार आहेत. भारतीय प्रकारांचे चार गट करता येतात- (१) मोतिया बेलाची फुले दुहेरी, पाकळ्या गोलसर व कळ्या गोल असतात. (२) बेलाचीही फुले दुहेरी व पाकळ्या लांबट असतात. (३) हझारा बेलाची (हजारी मोगरा) फुले एकेरी असतात. (४) मुंग्राच्या फुलांच्या पाकळ्यांची बरीच मंडले असतात आणि त्या गोलसर कळ्यांचा व्यास सुमारे २·५० सेंटिमीटर असतो.



### हे आवर्जून करा..

'मोगरा फुलला, मोगरा फुलला....' हा अभंग कोणत्या संतांनी लिहिला आहे? त्याला संगीत कोणी दिलं आहे? आणि तो कोणी गायला आहे? हे शोधा आणि आई-बाबांसोबत हा अभंग नक्की ऐका!

**शास्त्रीय माहिती :** मोगरा या फुलाला बटमोगरा असेही म्हटले जाते. या फुलाला हिंदीत-बनमल्लिका, चंबा, मोघ्रा, इंग्रजीत-अरेबियन जॅस्मिन, तस्कन जॅस्मिन, लॅटिनमध्ये जॅस्मिन सँबॅक असे म्हणतात. झुडपासारखे काहीसे सरळ वाढणारे हे फूलझाड भारतात सर्वत्र आढळते. हे उष्ण व उपोष्ण कटिबंधात सर्वत्र आढळते. प्राचीन काळापासून या झाडाची लागवड भारतात होत असून, हे झाड मूळचे भारताच्या पश्चिमेकडील भागातील असावे.

## तुम्हाला माहीत आहे का?

- मोगरा हे हवाई, इंडोनेशिया आणि फिलिपिन्स या देशांचे राष्ट्रीय फूल आहे.
- मोगऱ्याच्या फुलांचे उत्पादन ३-४ वर्षांनी सरासरी १० ते १२ टन प्रतिहेक्टरी मिळते. त्यामुळे मोबदलाही चांगला मिळू शकतो.
- मोगरा ही प्रजाती ओलिएसी कुलातील आहे. या प्रजातीत जाई (चमेली), जुई, मोगरा इत्यादी सुमारे २०० विविध सुवासिक फुलांचा समावेश होतो.

**बहर :** फुलांचा बहार उन्हाळ्यात व पावसाळ्यात विशेषतः जून-जुलैमध्ये अधिक येतो. वर्षभर थोडी-थोडी फुले येत असतात. दुहेरी फुलांचे प्रकार सर्वाधिक लोकप्रिय असून, उत्तर प्रदेश व तमिळनाडूत त्यांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. फुलांचे हेक्टरी १,५०० किलोग्रॅम उत्पन्न येते. आजवर सर्वाधिक उत्पन्न २,५०० किलोग्रॅम आल्याची नोंद आहे. एका किलोग्रॅममध्ये ३,००० ते ४,००० फुले मावतात. या फुलांना मुंबई, चेन्नई, बंगळुरू, नागपूर, हैद्राबाद, पुणे इ. मोठ्या शहरांत मोठी मागणी असते. महाराष्ट्रात या फुलांची शेती करणे, सोपे, सुटसुटीत व कमी खर्चाचे आहे. या फुलांना बाजारपेठेत वर्षभर सतत मागणी असते आणि चांगला बाजारभाव मिळतो.

• Registered • Date of Publication : शुक्रवार, २१ जून २०२४ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.



# रेकॉर्डब्रेकर स्मृती

महाराष्ट्राची स्टार महिला क्रिकेटपटू स्मृती मानधना सध्या जगभरातल्या क्रिकेटप्रेमींमध्ये लोकप्रिय ठरते आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध नुकत्याच झालेल्या सामन्यात स्मृतीने एकदिवसीय क्रिकेट कारकीर्दीतले सहावे शतक झळकावले. आज आपण जाणून घेणार आहोत तुफान फटकेबाजीसाठी लोकप्रिय ठरलेल्या आपल्या मराठमोळ्या स्मृतीविषयी.

| स्पर्धा | सामने | धावा | शतक | अर्धशतक |
|---|---|---|---|---|
| कसोटी | ६ | ४८० | १ | ३ |
| एकदिवसीय | ८३ | ३३५९ | ६ | २६ |
| टी-२० | १३३ | ३२२० | ० | २३ |
| WPL | १८ | ४४९ | ० | २ |

देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांमध्ये स्मृती मानधना महाराष्ट्र राज्याच्या संघाकडून खेळते.

## बाविसाव्या वर्षी भारताची कर्णधार

स्मृतीने अवघ्या बाविसाव्या वर्षी भारताच्या महिला क्रिकेट संघाचे कर्णधारपद सांभाळले होते. २०१९मध्ये गुवाहाटी येथे इंग्लंडविरूद्ध तीन सामन्यांची मालिका आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी पहिल्याच सामन्यात हरमनप्रीत कौर दुखापतीमुळे बाहेर पडली. तिच्या अनुपस्थितीत कर्णधारपदाची जबाबदारी स्मृतीच्या खांद्यावर आली होती.

## नवव्या वर्षी महाराष्ट्राच्या संघात

स्मृती आज २९ वर्षांची असली, तरी वयाच्या अवघ्या नवव्या वर्षीच तिची महाराष्ट्र राज्याच्या क्रिकेट संघात निवड झाली होती. विशेष म्हणजे, राज्याच्या १५ वर्षांखालील मुलींच्या संघात तिचा समावेश होता. म्हणजे इतर मुली तिच्यापेक्षा मोठ्या होत्या. आणखी एक आश्चर्य वाटावे अशी गोष्ट म्हणजे, वयाच्या अकराव्या वर्षी तिची महाराष्ट्राच्या १९ वर्षे वयाखालील संघामध्ये निवड झाली. अर्थात हे शक्य झाले होते तिने घेतलेल्या अपार मेहनतीमुळेच.

## द्विशतक करणारी पहिली भारतीय महिला

एक दिवसीय सामन्यात द्विशतक करणारी पहिली भारतीय महिला म्हणून स्मृतीला ओळखले जाते. ऑक्टोबर २०१३मध्ये तिने हा विक्रम केला. गुजरातविरुद्धच्या सामन्यात महाराष्ट्राकडून खेळताना स्मृतीने १५० चेंडूत नाबाद २२४ धावा केल्या. बडोदा येथे झालेल्या १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत स्मृतीने हा इतिहास रचला.

**२४ चेंडूत अर्धशतक :** टी-२० सामन्यात सर्वात जलद अर्धशतक झळकावणाऱ्या खेळाडूंच्या यादीत स्मृतीचे नाव घेतले जाते. स्मृतीने अवघ्या २४ चेंडूमध्ये ५० धावा केल्या होत्या. विशेष म्हणजे २०१८ आणि २०२१ मध्ये स्मृतीने 'आयसीसी महिला क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्कार' जिंकला. दोनवेळा हा पुरस्कार जिंकत स्मृतीने इथेही इतिहास नोंदवला आहे.



जन्म : 18 जुलै 1995 I सांगली, महाराष्ट्र

- २०१६ मध्ये विमेन्स चॅलेंजर ट्रॉफीमध्ये खेळताना स्मृतीने इंडिया रेड संघासाठी तीन सामन्यांमध्ये तीन अर्धशतके केली. या स्पर्धेत ती सर्वाधिक धावा करणारी खेळाडू ठरली.
- महिला प्रीमियर लीगमध्ये (WPL) स्मृती रॉयल चॅलेंजर्स बंगळूर संघाकडून खेळते.
- जगातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या महिला क्रिकेटपटूंमध्ये स्मृती चौथ्या क्रमांकावर आहे. तिचे वार्षिक मानधन ३ कोटी रूपये आहे.